# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड** **दिनांक १४/०५/२०१८**

## १) घरफोडी :-

**अ) भाग्यनगर :-** दिनांक ०१.०५.२०१८ रोजी चे १८.५० ते ०२.०५.२०१८ चे ०८.०० वा. चे सुमारास संकेतनगर, नांदेड यातील फिर्यादी हा त्याचे गावी गुंज येथे घराला कुलूप लावुन गेला असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने घराचे कुलूप तोडुन आत प्रवेश करुन कपाटातील सोन्याचे दागीने १) सोन्याचे गंठन २) सोन्याचे झुमके ३) सोन्याचे वेल ४) सोन्याचे दोन आंगठी असा एकुण १,२०,४५०/- रुपयाचा माल चोरुन नेला आहे. वगैर **फिर्यादी त्र्यंबक रामकिशन नरवाडे, वय ३२ वर्षे व्यवसाय शेती रा.संकेतनगर भावसार चौक, नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.भाग्यनगर** गुरनं.१३०/२०१८ कलम ४५७, ३८० भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/२२५९ श्रीरामे, मो.क्रं.९४२१७६१६५२** हे करीत आहेत.

**ब) भाग्यनगर :-** दिनांक ११.०५.२०१८ रोजी चे ०८.३० ते २३.३० वा. चे सुमारास अशोकनगर जंगमवाडी, नांदेड यातील फिर्यादी हा त्याचे परिवारासह वाशीम येथे चुलत भावाचे लग्नासाठी घराला कुलूप लावुन गेला असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने तोडुन आत प्रवेश करुन कपाटातील सोन्याचे दागीने १) सोन्याचे कर्णफुल २) सोन्याचे पान ३) सोन्याचे चेन व चांदीचे दागीने असा एकुण ९८,२५०/- रुपयाचा माल चोरुन नेला आहे. वगैर **फिर्यादी महेंद्र केशव कोरके, वय ३५ वर्षे व्यवसाय वीटभट्टी चालक रा.सम्राटनगर, नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.भाग्यनगर** गुरनं.१२९/२०१८ कलम ४५७, ३८० भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/९३१ राम बैनवाड, मो.क्रं.७७४४००५९३१** हे करीत आहेत.

**क) भाग्यनगर :-** दिनांक १२.०५.२०१८ रोजी चे ०७.०० ते २२.०० वा. चे सुमारास पशुवैद्यीकीय हॉस्पीटल पाण्याचे टाकी जवळ अशोकनगर, नांदेड यातील फिर्यादीचे दवाखाण्यातील असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने अंदाजे किंमत ४२,०००/- रुपयाचा माल चोरुन नेला आहे. वगैर **फिर्यादी डॉ.मोहमद रसियोद्यीन खाजा अहेमदीदिन, वय ३७ वर्षे व्यवसाय पशुवैद्यकीय अधिकारी ना.वा.म.न.पा.नांदेड रा.गुलजार बाग गल्ली नं.०६ देगलुर नाका, नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.भाग्यनगर** गुरनं.१३१/२०१८ कलम ४५४, ४५७, ३८० भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/७० एस.एम.गायकवाड, मो.क्रं. ०२४६२-२६१३६४** हे करीत आहेत.

## २) वाळु (रेती) चोरी :-

**देगलूर :-** दिनांक १३.०५.२०१८ रोजी चे १२.३० वा. चे सुमारास नरगल रोड देगलूर दर्गाजवळ यातील फिर्यादी हा कर्तव्यावर असतांना सदर आरोपी यांनी संगनमत करुन आपल्या ताब्यातील ट्रॅक्टर ट्रॉलीसह त्यामध्ये रेती ०१ ब्रास भरुन कि.अं.३०००/- रु.ची विनापरवाना बेकायदेशिररित्या घेवून जात असतांना मिळुन आले. त्यांनी शासनाची फसवणूक केली. वगैरे वरून **फिर्यादी पोकॉ/३०७९ कैलास तुळशीराम गीते वय ३० वर्षे ने.पोस्टे देगलूर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. देगलूर** गुरनं १८५/२०१८ कलम ३७९,३४ भादवी सह क.४८(७)(८) महाराष्ट्र जमिन महसूल अधि.१९६६.प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१९१८ बोबले मो.क्र. ९९२३७०४९५६** हे करीत आहेत.

## ३) चोरी :-

**अ) उमरी :-** दिनांक १२.०५.२०१८ रोजी चे २२.०० वा. ते १३.०५.२०१८ चे दरम्यान, केसरी कंम्पाऊड उमरी फिर्यादीचे दुकाना समोर, जि.नांदेड यातील फिर्यादी यांनी त्यांची बोलेरो पिकअप डागने भरलेली गाडी दुकाना समोर रोडवर उभी केली असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने गाडीतील चार चप्पल चे डाग अंदाजे किंमत २०,०००/- रुपयाचा माल चोरुन नेला. वगैरे वरून **फिर्यादी धोंडीबा सुर्यभान मदने, वय ३५ वर्षे रा.पहाड गल्ली, उमरी जि.नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. उमरी** गुरनं ८०/२०१८ कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१५९६ एन.पी.मुडलोड, मो.क्र. ९९२३४१७५९६** हे करीत आहेत.

**ब) किनवट :-** दिनांक १३.०५.२०१८ रोजी चे १३.३० वा.चे सुमारास, मार्कंडेश्वर मंदिरा मागे, किनवट जि.नांदेड येथे यातील फियादी हा नमुद ठिकाणी झाडाखाली बसला असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने त्याचे खिशातील बैल विकलेले किंमत ४८,०००/- रुपये चोरुन घेतले. वगैरे वरून **फिर्यादी भिमराव नागोराव कुडमेथे, वय ३५ वर्षे व्यवसाय शेती रा.बुधवार पेठ किनवट जि.नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.किनवट** गुरनं ९३/२०१८ कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/गवई, मो.क्र. ९४२३५१०१९३** हे करीत आहेत.

## ३) आत्महत्येस प्रवृत करणे :-

**हिमायतनगर :-** दिनांक ०८.०५.२०१८ चे १८.०० वा. सुमारास मयताचे राहते घरी एकंबा, ता.हिमायतनगर,जि.नांदेड येथे यातील **मयत नामे गजानन माधव नरवाडे, वय २७ वर्षे रा.एकंबा, ता.हिमायतनगर जि.नांदेड** यास आरोपीतांनी घराचे बांधकामास विरोध करुन व मी ग्रामपचायत सदस्य व तंटामुक्ती अध्यक्ष आहे असे म्हणुन यातील नमुद आरोपीतांनी संगनमत करुन शिवीगाळ करुन धमकी दिल्याने त्या त्रासास कंटाळुन तननाशक विषारी औषध पिला असता त्यास उपचारकामी दि.१३.०५.२०१८ रोजी सरकारी दवाखाना नांदेड येथे नेले असता उपचारा दरम्यान मरण पावला. वगैर **फिर्यादी मारोती माधव नरवाडे, वय २२ वर्ष व्यवसाय मजुरी रा.एकंबा, ता.हिमायतनगर,जि.नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे.हिमायतनगर** गुरनं. ५७/२०१८ कलम ३०६, ३४ भादविप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोनि/लटपटे, पो.स्टे.हदगाव मो.क्र. ९८२३४२२०१०** हे करीत आहेत.

## ४) हयगयीने वाहन चालवुन स्वतःचे मरणास कारणीभुत (अपघात) :-

**मुदखेड :-** दिनांक १३.०५.२०१८ रोजी चे ०१.०० वा. चे सुमारास,आहिल्याबाई होळकर चौक बायपास रोड, मुदखेड जि.नांदेड येथे यातील मयत नामे मिरनासेर अली मिरसिराजअली, वय ४० वर्ष रा. पिरबुऱ्हान नगर, नांदेड हा नांदेड येथुन सिंधी ता.उमरी येथे दुध आणण्यासाठी गाडी घेवुन जात असतांना आपले ताब्यातील वाहन हयगयी व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन किलोमिटर दर्शवनारे बोर्डाचे पिलरास जोराची धडक देवुन स्वतःचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी मिरउस्मानअली मिरसिराजअली, वय ४८ वर्षे व्यवसाय व्यापार रा.पिरबुऱ्हान नगर, नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरून **पो.स्टे.मुदखेड** गुरन ७९/२०१८ कलम २७९, ३०४ (अ), भादंवि कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/राठोड, मो.नं. ९८२३१४३२४५** हे करीत आहेत.

## ५) विवाहितेचा छळ :-

**मुदखेड :-** दिनांक १२.१२.२०१४ ते आज पावेतो दि. १३.०५.२०१८ चे दरम्यान महाविर चौक ता.अंबड जि.जालना येथे यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी महिलेस दोन लाख रुपये घेवून ये व तुला मुल बाळ होत नाही असे म्हणुन तीचा शारीरीक व मानसिक छळ केला. तसेच लाथा बुक्याने मारहाण करुन शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली .वगैरे वरुन **२६ वर्षीय असलेल्या महिला फिर्यादीने** दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे.मुदखेड** गुरनं. ८०/२०१८ कलम ४९८(अ),३२३,५०४,५०६, ३४, भादवि कायदयाप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/२०५४पाटील , मो.क्र.९७६३६९८००८** हे करीत आहेत.

## ६)बेकायदेशिररीत्या गावठी दारु बाळगुन मिळुन आला :-

**देगलुर :-** दिनांक १३.०५.२०१८ रोजी चे १७.३० वा. चे सुमारास आरोपीचे घरासमोर मौ. बळेगाव, ता.देगलुर जि.नांदेड येथे यातील नमुद आरोपीने विनापरवाना बेकायदेशिररित्या हातभटीची गावठी दारु २८ पॉकेट किंमती १४००/- रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याच्या उददेशाने ताब्यात बाळगतांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/९५८ दिगांबर दत्तात्रय बगाडे, पो.स्टे.देगलुर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.देगलुर** गुरन १८६/२०१८ कलम ६५ (ई), महाराष्ट्र प्रो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/९५८ दिगांबर दत्तात्रय बगाडे, मो.क्र.७७७५९०१२७९** हे करीत आहेत.

## ७) बेकायदेशिररीत्या देशी दारु बाळगुन मिळुन आला :-

**देगलुर :-** दिनांक १३.०५.२०१८ रोजी चे १५.४० वा. चे सुमारास हनुमान मंदिर जवळ मौ.देगाव, ता.देगलुर जि.नांदेड येथे यातील नमुद आरोपीने विनापरवाना बेकायदेशिररित्या देशी दारु भिंगरी संत्राच्या १८० एम.एल.च्या ४० बॉटल किंमती २०८०/- रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याच्या उददेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/ज्ञानोबा शिवाजी काळे, पो.स्टे.देगलुर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.देगलुर** गुरन १८८/२०१८ कलम ६५ (ई), महाराष्ट्र प्रो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/ज्ञानोबा शिवाजी काळे, मो.क्र. ९४२००९००७४** हे करीत आहेत.

## ८) मिलन डे नावाचा मटका खेळत असताना मिळुन आला :-

**इतवारा :-** दिनांक १३.०५.२०१८ रोजी चे २०.१० वा. चे सुमारास देगलुर नाका येथील लोखंडी पोल जवळ सार्वजनिक रोडवर, नांदेड येथे यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या लोकांकडुन पैसे घेवुन मिलन डे नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असताना नगदी १९५०/- रुपयाचा माल व जुगाराचे साहित्यसह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/नंदकिशोर पंडीतराव सोळंके,पो.स्टे.इतवारा** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.इतवारा** गुरन. १२७/२०१८ कलम १२ (अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोना/२३२० शिंदे, मो.क्र.०२४६२-२३६५१०** हे करीत आहेत.

## ९) तिर्रट नावाचा जुगार खेळत असताना मिळुन आला :-

**वजिराबाद :-** दिनांक १३.०५.२०१८ रोजी चे ०१.४० वा. चे सुमारास गंगाचाळ येथील बंद टिन पत्राचे रुममध्ये, नांदेड येथे यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या तीन पत्ती तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असताना नगदी ६,०४०/- रुपये व ७ मोबाईल अंदाजे किंमत १९,५००/- रुपये असा एकुण २५,५४०/- रुपयाचा माल व जुगाराचे साहित्यसह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/किरण सुरेश पठारे,पो.स्टे.वजिराबाद** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.वजिराबाद** गुरन. १००/२०१८ कलम ४, ५, मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोना/७२२ दामेकर, मो.क्र.९९२३६९५७२२** हे करीत आहेत.

## १०) गळफास घेवुन आकस्मात मृत्यूः-

**उस्माननगर :-** दिनांक १३.०५.२०१८ रोजी चे १३.०० वा.चे सुमारास कळंबा शिवार, ता.कंधार जि.नांदेड यातील फिर्यादीचा पुतण्या हा त्याचे शेतातील माळावरील झाडाला फाशी घेतल्याचे कळल्याने ते माळावर गेले असता यातील मयत नामे परमेश्वर गोविंद एकाळे, वय २० वर्षे रा.काटकळंबा, ता.कंधार जि.नांदेड हा हातपाय हालवत असल्याने त्यास उपचार कामी बारुळ येथे नेले असता उपचारा दरम्यान मरण पावला. वगैरे **खबर देणार माधव विश्वांभर एकाळे, वय ४२ वर्षे रा.काटकळंबा, ता.कंधार जि.नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.उस्माननगर** आ.मृ.१५/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ.मृ. दाखल असुन **तपास पोना/२०६८ कागणे, मो.नं.०२४६६-२६२२३३** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४